# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/210/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १४ ◆अंक ४४ ◆ अमरावती ◆दि. २२ ते २८ फेब्रुवारी २४ ◆पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com


## ‘मविआ’ची बैठक रद्द, पुढील बैठक २७ रोजी

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महा वकास आघाडी आणि महायुतीकडून बैठकांचा सिलसिला सुरू आहे. जागावाटपाच्या काही जागांचा निर्णय घेण्यासाठीमहाविकास आघाडीची उद्या (२२ फेब्रुवारी) बैठक होणार होती. पण अचानक ही बैठक रद्द करण्यात आली आहे. त्याऐवजी बैठक आता २७ फेब्रुवारीला मुंबईत होणार आहे. या बैठकीचे निमंत्रण वंचित बहुजन आघाडीला पाठवले नसल्याचे कळते. मात्र, याला अद्याप दुजोरा मिळालेला नाही. राज्यातील लोकसभेच्या सर्व ४८ जागा महाविकास आघाडी लढवणार आहे. कोणत्याही परिस्थितीत भाजपला हरवण्याचा चंग ‘मविआ’ने बांधला आहे.

# भटक्या विमुक्त जाती -जमातीतील नागरिकांना आधार कार्ड देण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करा

### महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश

मुंबई: भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरिकांना जन्म दाखला, आधारकार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, आयुष्यमान भारत आरोग्य पत्रिका देण्याबाबत कार्यवाही करावी. या समाजातील नागरिकांना आधारकार्ड देण्याबाबत महिनाभरात प्राधान्यक्रमाने शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, असे निर्देश महसूल, पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय विकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत दिले.

भटक्या विमुक्त जातीतील नागरिकांना विविध प्रमाणपत्रे देण्यासंदर्भात इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मंत्रालयात बैठक झाली. याप्रसंगी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रफुल्ल ठाकूर आणि भटके विमुक्त विकास परिषदेचे पदाधिकारी हजर होते. तसेच सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी आणि इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.



यावेळी मंत्री श्री. सावे म्हणाले, भटक्या विमुक्त जातीतील नागरिकांना विविध दाखले व प्रमाणपत्र मिळण्यासाठी विविध शासकीय विभागांमार्फत निर्देश झालेले आहेत.

या समाजातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यासाठी प्रामुख्याने जन्म दाखला, आधारकार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, आयुष्यमान भारत आरोग्य पत्रिका, जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र यांची गरज असते ते मिळताना विविध समस्या व अडचणींचा सामना करावा लागतो. हे टाळण्यासाठी बैठकीत चर्चा करण्यात आली.भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरीकांना आधार कार्ड देण्याबाबत माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) यांनी क्षेत्रिय स्तरावर सुचना दिलेल्या आहेत तसेच या अनुषंगाने विशेष मोहिम राबविण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरीकांना शिधापत्रिकाचे वितरण व्हावे यासाठी विशेष मोहिम राबविण्याकरिता अन्न व नागरी पुरवठा विभागाने कार्यवाही सुरू केली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने आयुष्यमान भारत कार्ड व सामाजिक न्याय विभागाने जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती यावेळी दिली.

## ‘सगेसोयऱ्या ’च्या अंमलबजावणीसाठी शनिवारपासून आंदोलन

### मनोज जरांगे–पाटील यांचा इशारा



वडीगोद्री : राज्य सरकारने विशेष अधिवेशन घेऊन मराठ्यांना दिलेले १० टक्के आरक्षण ज्यांना पाहिजे ते घेतील, परंतु आमची मागणी ओबीसीतून आरक्षण देण्यासह सगेसोयऱ्यांच्या अध्यादेशाच्या अंमलबजावणीची आहे. त्यामुळे जोपर्यंत सगेसोयऱ्यांच्या अध्यादेशाची अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत टप्प्या-टप्प्याने आंदोलने हाती घेतली जाणार आहेत. त्याची सुरुवात २४ फेब्रुवारीपासून होत आहे. पहिल्याच टप्प्यात सकाळी १०.३० ते १ वाजेपर्यंत गावागावात आंदोलन, प्रचारासाठी गावात येणाऱ्या पुढाऱ्यांच्या वाहनांना गावबंदी करू, तरीही वाहने आली तर ती ताब्यात घेऊन निवडणुकीनंतर परत केली जातील, असा इशारा मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारला दिला आहे. जोपर्यंत मराठ्यांना आरक्षण मिळत नाही तोपर्यंत निवडणुका घेऊ नये, अशी मागणीही त्यांनी यावेळी बोलताना केली.राज्य सरकारच्या मंगळवारच्या विशेष अधिवेशनानंतर आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी जरांगे पाटील यांनी बुधवारी अंतरवाली सराटी येथे समाजबांधवांच्या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा ठरवली. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना जरांगे-पाटील म्हणाले की, मंगळवारी घेण्यात आलेल्या विशेष अधिवेशनात सरकारने मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याचा निर्णय घ्यायला हवा होता, परंतु १० टक्के आरक्षण देऊन बोळवण करण्याचा सरकारचा डाव आहे. आम्हाला हे आरक्षण मान्य नसून या आरक्षणाची आमची मागणीच नव्हती. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण पाहिजे आम्ही दिलेल्या व्याख्येसह सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणीकरावी, परंतु या मागणीचा कोठेही उल्लेख केला गेला नाही, असे नमूद करून ते म्हणाले की, आपल्याला शांततेचा लढा उभारावा लागणार आहे. आपल्या न्यायासाठी आता टप्प्या-टप्प्याने आंदोलने हाती घेणार आहोत.

## अनुसूचित जातीचे १० हजार विद्यार्थी ३ महिन्यांपासून दुधापासून वंचित

### समाजकल्याण वसतिगृह, आश्रमशाळेतील भोजन पुरवठ्यात गोंधळ

अमरावती : अमरावती विभागातील समाजकल्याणच्या वसतिगृहात शिकणारे अनुसूचित जातीचे १० हजार विद्यार्थी दुधापासून वंचित आहेत. विभागाने १६ नोव्हेंबर २०२३ पासून ते आजपर्यंत विद्यार्थ्यांना दुध पुरवठा करण्याबाबतचे आदेश जाणीवपूर्वक न काढल्यामुळे अनुसूचित जातीच्या विद्यार्थी त्यापासून वंचित आहेत. ही एक गंभीर बाब आहे, असे सांगत समाजकल्याण वसतिगृहे व आश्रमशाळा भोजन पुरवठ्यात अपहार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी भीमशक्ती संघटनेतर्फे मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या तक्रार निवेदनातून करण्यात आली आहे. राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभागाचे ४४१ शासकिय वसतिगृह व अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींसाठी १०० निवासी आश्रमशाळा आहेत. अमरावती विभागात ८७ वसतिगृह व २६ निवासी आश्रमशाळा असून यामध्ये १० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अमरावती विभागात शासन निर्णयानुसार एकूण ११३ वसतिगृह व निवासी आश्रम शाळेत १६ नोव्हेंबर २०२३ पासून कैलास फुड ॲण्ड किराणा जनरल स्टोअर्स, जे.व्ही. ब्रिक्स इंडिया प्रा.लि. कंपनीमार्फत भोजन पुरवठा होत असल्याचे सामाजिक न्याय विभागाने राज्य शासनास कळविले आहे. ६ नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रवेशित विद्यार्थ्यांना दररोज २०० मिली साखरयुक्त सकस पौष्टिक दुध देणे, ही स्थानिक स्तरावर संबंधित सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांची जबाबदारी राहिल असे शासन निर्णयात नमुद आहे. १६ नोव्हेंबर २०२३ पासून आजपर्यंत विद्यार्थ्यांना दुध पुरवठा करण्याबाबत आदेश काढण्यात आलेले नाहीत. अमरावती विभागातील अनुसूचित जातीचे १० हजार विद्यार्थी दुधापासून वंचित आहेत.



दुध पुरवठा आदेश जाणीवपूर्वक न काढणे ही एक गंभीर बाब आहे. दुध पुरवठा आवश्यक असताना दुध पुरवठा होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. रक्तदाब नियंत्रित ठेवणे, स्ट्रेस आणि डिप्रेशनपासून बचाव करण्यासाठी अपचन आणि ॲसिडीटी पोटाशी संबंधीत आजार दूर करणे, वाढते वजन कमी करणे, हाडे आणि स्नायु मजबूत होण्यासाठी दुधाचे सेवन केल्याने हृदयविकार टाळण्यास मदत होते. त्यामुळे दुध हे आरोग्यासाठी उत्तम मानले जाते. उर्जेचा संपूर्ण स्त्रोत असताना दुध पुरवठा आदेश न काढून काही वसतिगृहातील विद्यार्थ्यांकडून दुध मिळत असल्याचे लिहून घेतले जात आहे. वसतिगृह गृहप्रमुख / गृहपाल यांनी कोणताही दुध पुरवठा आदेश नाही, असे माहिती अधिकारात स्पष्टपणे लेखी लिहून दिले आहे. या गंभीर प्रकाराची शासन स्तरावर समितीमार्फत चौकशी करावी. दोषींवर फौजदारी कार्यवाही करून निलंबित करण्याची मागणी भीमशक्ती संघटनेचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष पंकज मेश्राम यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव व आयुक्त समाज कल्याण पुणे यांच्याकडे दिलेल्या तक्रारीतून केली आहे.







काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।


कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## सुरांची साथ मावळली

*बिनाका, तरुणाई आणि अमीन सयानी असे एक चौकोनी शोभादर्शक नाते बुधवारीच निखळावे हा तो विषण्ण योगायोग होता. 'आवाज की दुनिया के दोस्तो,' अशी हाक कानावर पडली की, रेडिओ कानाशी लावाया आणि प्राण कानात आणून सुरांच्या साथीने उमटणारा तो आवाज कानात साठवावा, अशी सवय लागलेल्या त्या काळातील पिढ्यांना कालचा बुधवार उजाडण्याआधीच मावळल्याची दुःखद जाणीव झाली असेल, यात शंका नाही. अमीन सयानी यांनी गेल्या शतकातील जवळपास पन्नास वर्षांहून अधिक काळ बुधवारशी जोडलेले अनोखे नाते त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत जपले आणि अखेरचा श्वासदेखील बुधवारीच घेतला हा योगायोग दुःखद आहेच, पण जोडलेल्या नात्याशी इमान राखण्याकरिता नियतीनेदेखील त्यांना पुरेपूर साथ दिली, ही बाब काहीशी आश्चर्यकारकही म्हणावी लागेल. रेडिओ सिलोन नावाच्या त्या काळातील सर्वाधिक लोकप्रिय मनोरंजन वाहिनीला रेडिओच्या दुनियेत अनभिषिक्तपणे सर्वोच्च स्थानावर नेऊन ठेवणारा आणि त्या अधिकारातूनच त्या काव्यतील असंख्य गीतांना व गायक-गायिकांच्या शिरावर लोकप्रियतेचे शिरपेच बहाल करणारा मनोरंजन विश्वाचा अद्वितीय सम्राट म्हणून अजिंक्यपदावर बसलेला अमीन सयानी नावाचा आवाज भौतिक अर्थाने भूतकाळात जमा झाला असला, तरी त्या आवाजाच्या असंख्य लहरी मनोरंजनाच्या विश्वात अनंतकाळ लहरत राहणार आहेत. रेडिओ सिलोन नावाची तेव्हाची तरुणाईला वेड लावणारी मनोरंजन वाहिनी आज भूतकाळात जमा झाली आहे. त्यानंतरच्या काळात त्या वाहिनीवरील 'बिनाका गीतमाला' नावाच्या अमीन सयानी यांनी लोकप्रिय केलेल्या कार्यक्रमाची जागा त्यांच्याच आवाजावर स्वार होऊन पुढे 'सिबाका गीतमाला', 'कोलगेट-सियाका गीतमाला' म्हणून तरुणाईच्या मनावर सुरांची मोहिनी घालतच राहिली आणि भूतकाळातही गेली. पण, सध्याच्या तंत्रज्ञान क्रांतीच्या युगात हो मोहिनी कायम राखणारी मनोरंजन साधने प्रगतपणे नव्या पिढीच्या मनावरही त्या मोहिनीची जादू घालण्यासाठी सरसावली आणि अमीन सयानी नावाच्या आवाजाची जादू भविष्यातही कानाशी गुंजत राहिली. म्हणून अमीन सयानी देहरूपाने अज्ञाताच्या प्रवासास निघून गेले असले, तरी त्या आवाजाच्या रूपाने ते अजरामरच राहणार आहेत. असे म्हणतात की, कोणत्याही ध्वनिलहरी कधीच नष्ट होत नसतात. त्या वातावरणात आपले अस्तित्व युगानुयुगे जपून ठेवत असतात. वैज्ञानिकष्ट्या ते खरे असेल किंवा नसेल, पण अमीन सयानींच्या आवाजाच्या लहरी मात्र, नव्या तंत्रज्ञानाकडून पुढची कित्येक वर्षे ताजेपणाने जपल्या जाणार आहेत आणि त्या आवाजाच्या टॉनिकमुळे नव्या पिढ्यांच्या कानांचे रसिकता जपण्याकरिता पोषण होतच राहणार आहे. संगीत हे केवळ करमणुकीचे साधन नसते, त्या सुरांतही एक अध्यात्म असते आणि जगण्याच्या असंख्य समस्यांवर त्या अध्यात्माचा उतारा नेहमीच रामवाण ठरत असतो. अशा संगीताला अमीन सयानींसारख्या जादुई आवाजाची साथ मिळाली, तर ते समजावला आणि आचरणातही सोपे होते आणि समस्यांच्या वेदना हलक्या होऊन जगणे सुसह्य होते. अमीन सयानी हा केवळ मनोरंजनाच्या दुनियेतील एक जादुभरा आवाज नव्हता. त्या आवाजाने असंख्यांच्या बुधवारच्या संध्याकाळी अशा अध्यात्माच्या आनंदाची अनुभूतो दिली आणि समस्यांचे ओझे हलके करून अनेकांचे जगणे त्या त्या काळी समृद्धही केले, वयाच्या सातव्या वर्षीपासून बाल कलाकार म्हणून रेडिओशी नाते जडलेल्या अमीन सयानी यांची आवाजाची उभी कारकीर्द रेडिओच्या काळासोबत समांतरपणे सुरू राहिली. एवढा प्रदीर्घ काळ ते नाते जपणे आणि त्यातून एका विश्वाला समृद्ध करणे हे सामान्यांचे काम नसते, त्यासाठी कोणते तरी देवी पाठबळ लागते. अशा जबाबदाऱ्या केवळ व्यावसायिक भावनेने जपल्या किंवा पार पाडल्या जात नाहीत. कारण त्या जबाबदा-या नियतीने सोपविलेल्या असतात. अमीन सयानी यांनी आपल्यावर नियतीने सोपविलेली जबाबदारी समर्थपणे पार पाडलीच, पण अशा जवाबदाऱ्या पार पाडण्याचे भानदेखील पढच्या पिढ्यांना दिले आहे. १९५४ ते १९९४ अशा तब्बल चार दशकांच्या काळावर त्यांच्या आवाजाने रेडिओ विश्वावर अक्षरशः अधिराज्य गाजविले. ऑल इंडिया रेडिओवरील बालकांसाठीच्या कार्यक्रमात क्याच्या सातव्या वर्षीपासून सहभागी होऊन त्यांनी जोडलेले हे नाते अखेरच्या श्वासापर्यंत टिकलेच, पण त्यांच्या पश्चातही ते अतूट राहणार हा एक विक्रमच म्हणावा लागेल.*

# भावऋतुंनी बहरलेली 'अक्षरवेल'

नव्या जुन्या लिहित्या हातांना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे, नवोदितांमधील सुप्त गुणाला व्यक्त होण्याची संधी मिळावी, जाणत्या साहित्यिकांच्या प्रगल्भ मार्गदर्शनात त्यांना योग्य दिशा मिळावी; अशा अनेक उद्देशाने स्थापन झालेली 'अक्षरक्रांती फाऊंडेशन' ही साहित्य चळवळ गेल्या दीड दशकापासून साहित्यविषयक विविध उपक्रम राबवत आहे. मधे माणसाला माणसापासून दूर करणारा कोरोना काळ आला. परस्पर संपर्क ठेवणे अशक्य होऊन माणसे घराघरात बंद झाली. या काळात केवळ वाट्सअप माध्यमातून अक्षरक्रांती समूहाने जे विविध उपक्रम राबवले ते 'अक्षर'स्वरूपाचे ठरले. काव्यस्पर्धा, अष्टाक्षरी काव्यलेखन कार्यशाळा, अभंग व गजल रचना लेखन कार्यशाळा, समूहातील कवींच्या कवितेचे रसग्रहण अशा कितीतरी उपक्रमांनी समूहातील सभासदांना कायम लिहिते ठेवले. त्यांच्यातल्या प्रातिभकल्पनेला आवाहन करीत, सृजनक्षमतेला जागृत ठेवत अवघड काळातील जगणे सुसह्य, सक्रिय तसेच सकारात्म केले. दिनांक ९ व १० फेब्रुवारी २०१९ मध्ये मृद्गंधचे १ ले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन ताज आनंदाश्रम सावंगी तह. कळमेश्वर येथे संपन्न झाले होते. हे संमेलन या समूहाच्या परिश्रमाचे, जिद्दीचे, कार्यसिद्धीचे आणि यशस्वीतेचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येते. यात महाराष्ट्रातून अनेक साहित्यिक संमेलनातील विविध सत्रात सहभागी झालेले होते.




कविता व गझल कार्यशाळा, चर्चासत्रे, राष्ट्रीय कथा स्पर्धा, आंतरराष्ट्रीय काव्यस्पर्धा, पुस्तक प्रकाशन अशा विविध उपक्रमातून कायम सक्रिय राहणाऱ्या अक्षरक्रांती फाउंडेशनने १०१ कवितांचा दर्जेदार असा *'अक्षरवेल'* प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित करून काव्यप्रांतात आपल्या नावाची ठळक मोहोर उमटवली आहे. सचिन सुकलकर यांच्या ज्ञानपथ प्रकाशनाने 'अक्षरवेल'ला अंतर्बाह्य देखण्या, नेटक्या, आकर्षक रुपात काव्यरसिकांच्या, अभ्यासकांच्या हाती सोपवले आहे.कविता समाजमनाला आनंद देते. संस्कार, ऊर्जा, दिशा, विश्वास, जगण्यासाठी बळही कविता देत आली आहे. कविता समाज जीवनाचा आरसा असतो. कवीचा हुंकार असलेल्या कवितेत त्या त्या काळाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. 'अक्षरवेल' या प्रातिनिधिक संग्रहात समाविष्ट असलेल्या कविता विविधांगी आहेत. आशय, विषयाच्या मर्यादा पार करून जीवनातील सर्व अंगांना त्यांनी स्पर्श केला आहे. चिंतनाच्या पातळीवर जाऊन काही कवितांनी आत्मवेध घेतला, काहींनी गंभीरपणे जीवन तळाशी साचलेल्या दुःखानुभूतीला स्पर्श केला, सुखदुःखाच्या झुल्यावर झुलत ठेवणाऱ्या क्षणभंगुर आयुष्याला तर काही कवींनी जगण्याच्या न उलडणाऱ्या कोड्याला शब्द दिले. काही कविता कल्पनेच्या स्वच्छंदी अवकाशात मुक्तपणे विहार करतात, काही रसिकांनाही आपल्या शब्दपंखांवरुन फिरवून आणतात. आपापल्या अभिव्यक्ती कौशल्याने, आपल्यातल्या सृजन ऊर्मीने मनमोहक शब्दांची गुंफण करत साकारलेल्या सर्वच कविता मनाला आनंद देतात. तळहातावरून उडून गेलेल्या फुलपाखरांचे बोटाला चिकटलेले रंग तलमतेने या कवींनी रसिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी केलेली धडपड लक्षवेधी आहे.

सुप्रसिद्ध कादंबरीकार व लेखक अमळनेर येथील ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या 'नाठाळाचे अभंग' रचनेने या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाची सुरुवात झालेली आहे.

***मंबाजीची रूपे। पाहिली अनंत।। तुझा भगवंत। दिसेच ना***

संत तुकोबांनी समाजातील दांभिक वृत्तीवर प्रहार केले. भोळ्या-भाबड्या जन-लोकांच्या मनातील अंधश्रद्धेची जळमटं दूर करण्यासाठी जिवाचे रान केले. आजही हे चित्र फारसे बदललेले दिसत नाही. संवेदनशील कवी मनाला खऱ्या-खोट्याशी सामना करताना वैताग येतो; तेव्हा सज्जनांच्या वाटेतील अडथळे दूर करण्यासाठी, नाठाळांच्या माथी काठी घालण्यासाठी तुझ्या भगवंताने यावे, अशी या अभंगातील आर्त साद अस्वस्थ करून जाते. वऱ्हाड मातीशी, वऱ्हाडी बोलीशी निष्ठा राखणारे विदर्भातील आघाडीचे कवी विठ्ठल वाघ यांची 'भूकंप किल्लारी' नावाची कविता भूकंपानंतरचे भीषण चित्र रेखाटते. मृत्यू अटळ आहे, निसर्ग नियतीपुढे मानव किती थिटा आहे हे सांगताना,

***मृत्युच्या या तांडवाचा, खेळ सांगे आंधळा***
***चंद्रलोका जिंकणाऱ्या, मानवा तू पांगळा***

हे वास्तव कवी मांडून जातात. बबन सराडकरांची अल्पाक्षरी रचना जगण्याचे लौकिक भान प्रकट करते. उजेडाची आशा करताच अंधाराने जगणे व्यापून टाकावे, सुखाचा वारा येतो न येतो तोच दुःखाने वेढून घ्यावे.

***कंदीलाच्या खाली । अंधाराचे व्रण ।। तसे घरपण । काळोखले***

अशा चपखल शब्दांतून कवीने स्वप्न आणि वास्तवाची सीमा उलगडून दाखवली आहे. या प्रातिनिधिक काव्यसंग्रहातील आरंभीच्या कवितांमधील जीवनचिंतन लक्षणीय आहे.

एकीकडे बुफेच्या नावावर होणारी अन्नाची नासाडी तर दुसरीकडे अन्नाच्या कणासाठी मोताद असलेली उपाशी पोटं यातील विसंगती मांडत कविश्रेष्ठ लोकनाथ यशवंत यांची कविता जीवनाचा वास्तव चेहरा दाखवते. प्रताप वाघमारे यांची 'सांजपक्षी' कविता मनाला वेगळ्या विश्वात घेऊन जाते-

***मी रेखत असता मूक, आभाळावर चांदणनक्षी***
***मनात विहरत असतो, आठवांचा सांजपक्षी***

अशा ओळी वाचत जाताना तरल भाव, कल्पना, सौंदर्य यांच्यात नकळत मन गुंतून पडतं.

***ग्रंथ धर्मग्रंथ, पोथ्यापुराणं वारूळ साचलीत भोवती आपण अंध***
***सटवीने कशाला ? आपणच लिहिली ही अक्षरं आपली जखडले बंध***

असा वास्तववादी सुर आळवणारी वसंत वाहोकर यांची रचना युगायुगापासून आपल्या मेंदूत भरवलेल्या खुळचट कल्पनांना बाहेर काढण्याचा इशारा करते, सजगतेचे भान देते. समकालीन आघाडीचे कवी गणेश भाकरे यांची वास्तवाला भिडणारी 'जीव भूतकाळी खुळा' ही रचना आशय, आकृतीबंधाच्या दृष्टीने अंतर्बाह्य सुंदर आहे. झाली की माय बापांच्या कष्टाचा, प्रेमाचा त्यांना विसर पडतो. 'कसा विसरला लेक गाव वेशीच्या मातीला' गाव शहरातील ही विदारक स्थिती कमालीच्या पोटतिडकीने कवीने मांडली आहे.

अर्जुनबानो शेख यांची 'हे मायमाती..' ही कविता विशेष पसंतीस उतरली. आशयगर्भता, सहजसुंदर शब्दांची मांडणी, रचनेचा डौल सांभाळणारी मुक्तछंदातील ही कविता नितांत सुंदर आहे. अस्मानी-सुलतानी संकटाच्या झळा, कुरूप होत चाललेल्या व्यवहारी जगातील होरपळ, ऐन हातातोंडाशी आलेला घास पळवून नेणारा निसर्ग या दुष्टचक्रात सापडलेल्या शेतकरी बांधवांसाठी 'मायमाती'कडे

कवयित्रीने केलेली आळवणी अतिशय हृद्य आहे.

वऱ्हाडी बाजाच्या कवितेसाठी आणि सादरीकरणासाठी लौकिक असलेले खुशाल गुल्हाने यांची 'मोल घामाचं' ही कविता कृषी जीवनातील वास्तवता सांगून जाते.

***भर दांड लुगड्याले सांगे थिगय लावजो***
***शालू हिरवा जरीचा, साली म्होरल्या पायजो***

शेती व्यवसायावर आधारित ग्रामजीवनातील दुखरी कळ कवीने नेमकी टिपली आहे.

वाचकांना आपल्या अलवार शब्दकळांनी प्रेमात पाडणारी,आशय सौंदर्याने नटलेली सरोज गाजरे यांची 'आलं उधाण आभाळी' ही कविता निसर्गाची चित्रलिपी साकारते.

***'सारं नाचतं शिवार, गर्भ मृत्तिकेच्या पोटी***
***शीण विसरून बळी, गाणं भलरीचं ओठी'***

कवयित्रीच्या प्रतिभेला आलेले उधाण रसिक मनातही आनंदाचे उधाण आणते.

***लीलाधर दवंडे यांच्या 'पाऊस' कवितेतील,***
***फिटे पारणे डोळ्यांचे, दृश्य मनोहर दिसे***
***माझ्या तरुण मनास, लागे पावसाने पिसे***

या सहजसुंदर ओळी मनाला भावतात. पावसाने तृप्त झालेली धरा हिरवाईचा नवा साज लेते तसे कवीच्या प्रातिभकल्पनेला नवसर्जनाचे अंकुर फुटू लागतात. पावसाची विविध रूपं, श्रावण, ऋतू, प्रहर, माती अशा निसर्ग घटकांवरील कवितांनी संग्रहात रंग भरला. सर्वात श्रेष्ठ धर्म माणूसपण! स्वार्थापायी माणूस आपला धर्म विसरत एकमेकांपासून दूर चाललेला आहे. अजिजखान पठाण यांची गझल एकेका शेरातून मानवतेचे दर्शन घडवते.

***'अंतरी जपावी, प्रेम दया शांती***
***घडवावी क्रांती नव्यासाठी'***

असा सकारात्मक भाव मनामनात रुजवणारी चरणदास वैरागडे यांची अभंग रचना अभिव्यक्ती आणि बंध दोन्ही दृष्टीने समृद्ध आहे.

***मातीच्या कुशीत धान्य***
***अन् बाईच्या कुशीत जीव***

लय सांभाळत राहतात त्या ऋतुचक्राची जातकुळी एकच बाई आणि मातीची असा सृजनसोहळा प्रा. मीनल येवले यांच्या लेखणीने रसिकांच्या नजरेत आणून दिला आहे. ज्या मातीत खेळलो, लहानाचे मोठे झालो, संस्काराचे बाळकडू ज्या गावमातीने पाजले; तिच्याबद्दलच्या उमाळ्याविषयी-

***कुठेही असो अन्न पाणी, कुठेही मिळो ठाव***
***मनाच्या कप्प्यात असतो, गड्या आपला गाव***
***असा भाव गोविंद सालपे यांनी व्यक्त केला.***

साऱ्या जगताला जगवणाऱ्या 'मायमाऊली'चे उपकार जाणणारी सुचित्रा कुनघटकर यांची रचना तसेच

***जल सांडते हे जगत भांडते वर्षानुवर्षे,***

हे वास्तव सांगणारे एकनाथ गायकवाड यांचे हायकू सकस व समृद्ध आहेत .

अनेक कवींनी आईपणाच्या अवकाशाला जिव्हाळ्याचे शब्द देण्याचा प्रयत्न केला. रसिका येळवटकर यांनी मायलेकीच्या नात्याची घट्ट वीण उलगडत नेली. विद्या निनावे यांनी लेकरांचे भविष्य घडवण्यासाठी मायबाप खस्ता खातात. त्यांना त्यांचीच लेकरं वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवतात; ही खंत व्यक्त केली.

***सांभाळते ती मर्यादा, दोन कुळांची उत्तम***
***आदर्शाने तिच्या होई दूर जीवनाचा तम***

हा भाव व्यक्त करणारी सुलोचना लडवे यांची सहज साधी रचना आहे. संगीता मसराम यांची 'आई', विक्रम गांगुर्डे यांची 'माहेर झालं सुनं' या रचना याच आशयाच्या आहेत.आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचा वावर असून घरदार सांभाळत तिच्या कार्यकक्षा विस्तारल्या आहेत. दुहेरी भूमिका निभावताना होणारी तिची दमछाक काही कवितांनी नेमकी टिपली आहे. 'बाईपन मिरवनं भाऊ लै कठीण हाय रं', हे सांगत विजय वासडे यांनी विविध नात्यातील स्त्रीरूपाचे उत्कट दर्शन घडवले. ठिगळाच्या संसारातही ताठ मानेने जगणारी माय शारदा गणोरकर यांनी उभी केली. रक्ताचे पाणी करून लेकरांना सुखात ठेवणारी निशा काळे यांच्या कवितेतील माय मनाला भावते. आज चूलमूल सांभाळून तिच्या मनात अशा आकांक्षाचे अश्व धावू लागले आहेत. नवनव्या दिशा तिला खुणावू लागल्या; त्यामुळे स्त्रीची गगन भरारी कौतुकास्पद आहे; असा भाव कीर्ती लंगडे यांच्या कवितेत आहे. माहेर सोडून सासर आपलंसं करणारी, प्रसवकळा साहून लाभलेल्या मातृत्वासाठी आयुष्यभर झिजणारी स्त्री वंदना घोरसे यांना वंदनीय वाटते तर आयुष्याचे रेशमी, तलम पान नाजूक हाताने रंगवत जावे, सुखदुःख आले तरीही समतोल राखावा; असा सहज व साधा संदेश देणारी अर्चना धानोरकरांची रचना मनाला भावते. बाईपणाची थोरवी देविदास हनुमंत यांनी आपल्या रचनेतून गायली आहे.कवितेला कुठलाच विषय वर्ज्य नाही. आपल्या आयुष्यातील सुखदुःख, आशा- निराशा, चढ-उतार त्या त्या मनस्थितीतून मांडत कवी शब्दातून मोकळा होत असतो. त्याचे व्यक्त होणे प्रातिनिधिक स्वरूपाचे असते. संकटं आली की माणसाचा धीर सुटतो. कौटुंबिक समस्यांनी मनाचा तोल जातो; पण आलेल्या परिस्थितीशी धीराने सामना केला तर हळूहळू अवघड काळ निघून जातो. राजेश्वर शेळके यांनी 'होता येईल तेवढं' ह्या कवितेतून दिलेला संदेश सामान्य माणसाच्या मनाला धीर देतो. असाच आशय व्यक्त करणारी 'डोंबाऱ्याचा खेळ' ही मंजुषा कऊटकरांची रचना जीवन प्रवाहाला पुढे नेण्यासाठी ऊर्जावती होते.

**- प्रा.मीनल येवले**
**४२,विज्ञान नगर,मानेवाडा**
**नागपूर (मो.७७७४००३८७७)**

# नंदनवन कॉलनीत पूर्ववैमनस्यातून तरुणाची हत्या

## तीन आरोपींना अटक, एक अल्पवयीनही ताब्यात




अमरावती : पूर्ववैमनस्यातून एका तरुणाची चाकूने हल्ला चढवून हत्या करण्यात आली. ही घटना मंगळवार, २० फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास राजापेठ ठाण्याच्या हद्दीतील नंदनवन कॉलनी येथे घडली. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सोबतच एका अल्पवयीनालाही ताब्यात घेण्यात आले आहे.गणेश बाळकृष्ण कोहळे (२९) रा. जयनगर असे मृतकाचे नाव आहे. तर शैलेश चव्हाण, अजय सूर्यवंशी व रोहीत आस्कर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. गणेश व शैलेश यांच्यात जुना वाद होता. या वादाचा वचपा काढण्यासाठी शैलेशसह त्यांच्या सहकाऱ्यांनी मंगळवारी रात्री नंदनवन कॉलनी येथे गणेशला एकट्यात घेरले. त्यावेळी आपला जीव वाचविण्यासाठी गणेश हा परिसरातील एका घरात शिरला. त्यावेळी शैलेशसह त्याच्या सहकाऱ्यांनी त्या घराचे दार तोडण्याचा प्रयत्न केला. सदर कुटुंबातील सदस्यांनी दार उघडल्यावर शैलेशसह त्याच्या सहकाऱ्यांनी गणेशला घराबाहेर काढून त्याच्यावर चाकूने हल्ला चढविला. त्यात गंभीर जखमी झालेला गणेश हा रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळून त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर शैलेशसह त्याच्या सहकाऱ्यांनी तेथून पळ काढला. परिसरातील नागरिकांनी याबाबत तातडीने राजापेठ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेहाला शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून मारेकऱ्यांचा शोध सुरू केला. या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली असून एका अल्पवयीनालाही ताब्यात घेण्यात आले आहे. एक आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. दरम्यान, बुधवारी सकाळी मृतक गणेशच्या नातेवाइकांनी जिल्हा सामान्य रुग्णालयातील शवविच्छेदनगृहासमोर गर्दी केली. आरोपींना अटक होईपर्यंत शवविच्छेदन व मृतदेह ताब्यात घेण्यास त्यांनी नकार दिला. अखेर पोलिसांनी समजूत काढल्यावर नातेवाइक शवविच्छेदनास तयार झाले.

## दर्शनाकरिता गेलेल्या युवकाच्या बॅगसह २ लाख पळविले

अमरावती : रेल्वेस्टेशन मार्गावरील गजानन महाराज मंदिराच्या आवारात बॅग ठेवून दर्शनाकरीता गेलेल्या युवकाची बॅगसह रोख २ लाख रुपये पळविल्याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी रात्रीतून तिघांना अटक केली. देवा उर्फ देवेंद्र घाटे (रा. राजुरा घाटे, मुर्तिजापुर). श्याम वळसकर (रा. मुर्तिजापूर) आणि चंदू ठाकरे (रा. बाबाफाटा, कामरगाव) अशी अटकेतील लुटारुंची नावे आहेत. संतोष वामनराव भडके (वय ३८ रा. सावनेर, ता. नांदगाव खंडेश्वर) हा मंगळवारी दुपारी प्लॉटच्या खरेदीकरीता २ लाख रुपये घेऊन अमरावतीला आला होता. दरम्यान त्याला मुर्तीजापुर येथील एलआयसी एंजट गजानन ढाये यांनी फोन करून एलआयसीचे १७ हजार रुपये मागितले. भडकेने त्याला अमरावती रेल्वे स्टेशनसमोरील गजानन महाराज मंदिरात बोलाविले. तेव्हा ढाये हा देवा उर्फ देवेंद्रसोबत दुचाकीने आला. त्यानंतर भडके व ढाये मंदिरालगत बसले आणि काही वेळाने जवळील बॅग बाजूला ठेवून ते मंदिरात दर्शनाकरिता गेले. त्याचवेळी देवा बॅगसह २ लाख रुपये घेऊ न पसार झाला. दर्शन करून आल्यावर बॅग बेपत्ता दिसली तसेच ढायेचा मित्र सुध्दा नव्हता. त्यामुळे देवाने बॅग व रक्कम चोरल्याचा संशय येताच त्यांनी कोतवाली ठाण्यात धाव घेतली.

# 'भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने' यावर प्रा.श्याम मानव यांचे जाहीर व्याख्यान




नांदगाव खंडेश्वर : स्थानिक शिव, फुले, शाहू,आंबेडकर विचार मंच व कॉँग्रेसच्या वतीने येथील जुन्या आठवडी बाजारात भारतीय लोकशाही समोरील आव्हाने या विषयावर अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.शाम मानव यांचे जाहीर व्याख्यान झाले. यावेळी त्यांनी मोदी सरकारच्या जनविरोधी व शेतकरी विरोधी धोरणाबाबत सडकून टीका केली तसेच शिवकालीन इतिहासापासून तर महाराष्ट्राची परंपरा, लोकशाही समोरील आव्हाने व सध्याच्या राजकीय परिस्थितीवर सविस्तर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

माजी आमदार वीरेंद्र जगताप होते तर माजी आमदार ज्ञानेशरराव धाने पाटील, तुकाराम भस्मे, बाळासाहेब राणे, प्रकाश मारोटकर,अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे, सचिव हरीश देशमुख, सागर दुर्योधन ही मंडळी मंचावर होती. माजी आमदार वीरेंद्रजी जगताप यांनी अध्यक्षीय भाषणमध्ये शेतकऱ्यांच्या हमीभावाबाबत मोदी सरकारने दिलेल्या गॅरंटीचे काय झाले असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर संचालन डॉ. संजय जेवडे, आभार प्रदर्शन शहर कॉँग्रेसचे अध्यक्ष अमोल धवसे यांनी केले. यावेळी तालुका कॉँग्रेसचे अध्यक्ष निशांत जाधव, प्रदेश युवक कॉँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप, विठ्ठलराव चांदणे, देविदास सुने, कान्तेशर जाधव, सुनील मेटकर, शिवसेना उपजिल्हा संघटक ओंकार ठाकरे, ईद्रीसभाई, सीमाताई जाधव, सरफराज पठाण, शेख हारूण, गजानन मारोटकर, मुमताजभाई, दीपक भगत, विनोद चौधरी, दीपक सवाई, समीर दहातोंडे, गौतम सोनोणे, राजेंद्र सरोदे, रमेश ठाकरे, ज्योतपाल चवरे, विशाल रिठे, धनराज इंगोले, गजानन भडके, पांडुरंग कावळे, अजय भोयर, दिनेश धवस, सविता रंगारी, आशिष शिरभाते, तनवीर पटेल, उमेश सोनोणे, गोपाल लाड, प्रशांत देशमुख, विजय चींचे, विक्रम झाडे शहरातील तालुक्यातील बरीच मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिव, फुले, शाहू,आंबेडकर विचार मंच व कॉँग्रेस पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# छत्रपतींच्या जयघोषाने निनादले श्री हव्याप्र मंडळ




अमरावती : आकाशात उंच भगवा, त्यामागे पारंपारीक वेशभूषा साकारले तरूण-तरूणी आणि पारंपरिक पोवाळ्यावर थिरकणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साह शिवजयंतीला स्फुरण चढविणारा ठरला. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे सोमवारी (ता.१९) छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती सोहळा पार पडला. मंडळाच्या परिसरात काढण्यात आलेल्या रॅलीतून छत्रपतींच्या जयघोषाने संपुर्ण श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ निनादले होते. मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांतराव चेंडके, प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, दिपाताई कान्हेगावकर आदींनी शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन केले. दरम्यान पारंपरिक व्यायाम व क्रीडा कवायती सादर करण्यात आल्यात. प्रमुख वक्ते पुष्पक लोहीतकर यांनी मार्गदर्शन सांगितले की, ७०० वर्षांच्या मुघली, सुलतानी गुलामीचा अंधार जेव्हा या देशाची अस्मिता, देव, धर्म आणि संस्कृतीच्या अस्तीत्वाच्या मुळावर होता, तेव्हा छत्रपतींच्या रूपाने एक तेजस्वी सूर्याच्या उदयाने या गुलामीच्या अंधाराला संपवून टाकले. रयतेचं स्वराज्य स्थापन करून छत्रपती शिवाजी महाराज यांनी या देशाचा, मातीचा स्वाभिमान जागवला, देव-देश- धर्माचं स्वराज्य स्थापन केलं. आज आपण स्वतंत्र देशामध्ये जगत असलो तरी गद्दार आणि परकीयांच्या कटकारस्थानापासून या देशाला सुरक्षीत ठेवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असून त्यासाठी शिवाजी महाराज यांची जयंती प्रखर प्रेरणा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. यानंतर व्यासपीठावर उपस्थित डॉ. श्रीकांतराव चेंडके, प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांनी मनोगत व्यक्त करीत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांचेही अध्यक्षीय भाषणात सांगितले की, आजच्या युवकांनी सर्वप्रथम स्वत:चे चारित्र्य निर्माण करून एक आदर्श व्यक्तीमत्व होण्यावर भर दिल्यास हा देश जगाच्या पाठीवर सदैव बलवान राहील, असा विशास त्यांनी व्यक्त केला.

प्रा. मयुर दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत शिवजयंती सोहळ्याचे संचलन आकाश केशरवानी, पूजा कपाटे यांनी तर आभार मंदार सोनोने यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता ओंकार परदेशी, आदित्य पाचखेडे, वैभव जाधव, मंथन जांभुळकर, हर्ष गोयंका, राजवळ मेटकर, शिवम सोनोने यांनी सहकार्य केले.

# पार्वतीनगर व खोलापुरी गेट येथे विकसित भारत संकल्प यात्रा अभियान

अमरावती : अमरावती महानगरपालिका क्षेत्रात विकसित भारत संकल्प यात्रा बुधवारी (ता.२१) सकाळी १० ते १२.३० वाजेपर्यंत गजानन मंदिर मेन रोड, पार्वती नगर झोन क्र.५ व दुपारी ३ ते ५.३० वाजेपर्यंत इन फ्रंट ऑफ विजय पांडे हाऊस, खोलापुरी गेट, झोन क्र.५ येथे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी मान्यवर अतिथीसह अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी विकसित भारत संकल्प यात्रा अंतर्गत हमारा संकल्प विकसित भारत शपथ घेतली.

या यात्रेचा शुभारंभ सकाळी १० वाजता गजानन मंदिर मेन रोड, पार्वती नगर व दुपारी ३ वाजता इन फ्रंट ऑफ विजय पांडे हाऊस, खोलापुरी गेट येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. विकसित भारत संकल्प यात्रा मोहिमेचा रथ गजानन मंदिर मेन रोड, पार्वती नगर व इन फ्रंट ऑफ विजय पांडे हाऊस, खोलापुरी गेट येथे पोहचला.

उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले असेच विविध योजना बाबतचे लाभार्थ्यांना सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या.या विकसित भारत संकल्प यात्रेत शहरी भागात सरकारी योजनांची माहिती एलईडी व्हॅनमार्फत देण्यात आली. याशिवाय शिबिरामध्ये असंसर्गजन्य आजार निदान व उपचार देखील दिले जात आहेत.

या कार्यक्रमात सहाय्यक आयुक्त विवेक देशमुख, वैद्यकीय अधिकारी, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

# महेश मांजरेकर यांच्या 'ही अनोखी गाठ' चित्रपटातील 'सखी माझे देहभान' गाणे पाहिले का?



*झी स्टुडिओज आणि महेश मांजरेकर मुव्हीज निर्मित 'ही अनोखी गाठ' या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा आहे. या चित्रपटातील दुसरे गाणे नुकतेच प्रदर्शित झाले आहे. 'सखी माझे देहभान' असे बोल असणारे हे गाणे गौरी इंगवले हिच्यावर चित्रित झाले आहे. गौरीचा नृत्याविष्कार पुन्हा एकदा तिच्या चाहत्यांना अनुभवता येणार आहे.. वैभव जोशी यांचे भावपूर्ण बोल लाभलेल्या या गाण्याला हितेश मोडक यांचे संगीत लाभले आहे. सलमान अली आणि हितेश मोडक यांच्या गायकीने गाण्याला एक वेगळेच स्वरूप आले आहे.या चित्रपटात श्रेयस तळपदे, गौरी इंगवले, ऋषी सक्सेना, सुहास जोशी, शरद पोंक्षे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाचे संवाद सिद्धार्थ साळवी यांनी लिहिले आहेत. येत्या १ मार्च रोजी 'ही अनोखी गाठ' प्रेक्षकांशी बांधली जाणार आहे.*

*या गाण्याबद्दल महेश मांजरेकर म्हणतात, अर्थपूर्ण बोल लाभलेल्या गाण्याला संगीतही त्याच ताकदीचे लाभले आहे. या गाण्यात अनेक भावना दडल्या आहेत. मुळात गौरी एक उत्कृष्ट नर्तिका असल्याने तिच्या हावभावातून अनेक गोष्टी व्यक्त होतात. या गाण्यातून हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. गाणे चित्रपटाचा आत्मा असतो, त्यामुळे चित्रपटाच्या कथेइतकेच महत्व गाण्यांनाही आहे आणि ही जबाबदारी वैभव जोशी आणि हितेश मोडक यांनी लीलया पार पाडली आहे. संगीतप्रेमींना ही गाणेही आवडेल, यात शंका नाही.*

# लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाचा यंदा आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर भर

**यंदा आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर भर**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३७० जागा मिळवण्याचे लक्ष्य दिल्यानंतर भाजपने लोकसभा निवडणुकीचा प्रचार अधिक अत्याधुनिक पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे यामध्ये पहिल्यांदाच कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जाणार असल्याचे पक्ष सूत्रांनी स्पष्ट केले आहे. या प्रचार मोहिमेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने २०१४ पासून आतापर्यंत केलेली कामे आणि २०४७ पर्यंत भारताला विकसित बनवण्याची योजना या दोन्हींची माहिती प्रत्येक घरापर्यंत मोबाईलच्या माध्यमातून अगदी हायटेक पद्धतीने पोहोचवली जाणार आहे. यासाठी २५ हजारांपेक्षा जास्त आयटी तंत्रज्ञांची सेवा घेतली जाणार आहे. याशिवाय, आर्टिफिशियल इंटेलीजन्स या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे २२५ डाटा सेंटर देशभरात उभारण्यात आले आहेत, अशी माहितीही पक्षसूत्रांनी दिली. पंतप्रधान मोदी यांचा दूरदृष्टीपणा आणि केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांची विभागणी लाभार्थ्यांनुसार करण्यात आली आहे. ही माहिती रिल्स आणि व्हिडीओच्या माध्यमातून दिली जाणार आहे. यासाठी २४ तास युद्धपातळीवर काम करणारे 'वॉर रूम' तयार करण्यात आले आहे. येथे कंटेट रायटर, व्हिडीओ एडिटर, आणि २४ तास टेलेकॉलर तैनात केले जाणार आहे. भाजपने या निवडणुकीत 'तिसरी बार फिर मोदी सरकार' आणि 'अबकी बार चारसौ पार' अशा घोषणा दिल्या आहेत. भाजपचा हायटेक प्रचार हा वेगवेगळया स्तरावर विभागणी करण्यात आली आहे. यात भाजपचे नवनियुक्त सदस्य, प्रथम मतदार, महिला मतदार, अल्पसंख्यांक समूह, आयटीसह विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि सेना तसेच निमलष्करी दलाचे जवान अशा विविध गटांचा समावेश आहे. ही यंत्रणा सर्व मतदारसंघात राबवली जाणार आहे.

भाजप यंदाच्या निवडणुकीत आर्टिफिशिअल इंटेलीजन्सचा सर्वाधिक वापर करणार आहे. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हा एकच चेहरा 'प्रोजेक्ट' करण्यात येणार आहे.

त्यासाठी स्वतंत्र यंत्रणाच कार्यरत राहणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपचे सर्वच वरिष्ठ नेते सध्या देशभरातील मतदारसंघांचा दौरा करीत आहेत. या दौऱ्यामध्ये प्रत्येक मतदारसंघाच्या विभागनिहाय बैठकी घेण्यात येणार आहेत.

# रविकांत तुपकर यांना अखेर जामीन

बुलढाणाः मागील पंधरा दिवसांपासून बुलडाण्यात रविकांत तुपकर यांना जेल मिळणार की बेल ? लोकसभा निवडणूक जेलमधून लढणार की बाहेरून ? अशा विविध चर्चांना उधाण आले होते. न्यायालयाने सरकार पक्ष आणि तुपकरांची बाजू ऐकल्यानंतर निकाल राखीव ठेवण्यात आला होता. यानंतर सुनावणीसाठी तारीख पे तारीख मिळत होती. शेवटी आज बुधवारी (ता.२१) बुलढाणा न्यायालयाने आपला निकाल घोषित करीत रविकांत तुपकरांना बेल (जामीन) मंजूर केला आहे. तुपकर यांना न्यायालयाकडून जामीन मंजूर झाल्याने त्यांच्या समर्थकांनी जल्लोष केला. शेतकऱ्यांसाठी झालेल्या विविध आंदोलनात रविकांत तुपकर यांच्यावर दाखल २१ गुन्ह्यांत न्यायालयाने त्याना जमीन मंजूर केला होता. मात्र, जामीन रद्द करण्याच्या मागणीसाठी पुन्हा बुलडाणा पोलिसांनी जिल्हा न्यायालयात धाव घेत जामीन रद्द करण्याबाबत याचिका दाखल केली होती. या प्रकरणाची सुनावणी सलग पाच वेळा पुढे ढकलण्यात आली.






# शेतकरी आंदोलनाला पुन्हा हिंसक वळण!

## पोलिसांच्या कारवाईत एकाचा मृत्यू, २५ जखमी



नवी दिल्ली : आपल्या मागण्यांना घेऊन सरकार विरोधात आंदोलन करत असलेले शेतकरी शंभू आणि खनौरी सीमेवर मोठ्या संख्येने ट्रॅक्टर एकत्रित करत आहेत. दिल्लीकडे कूच करण्याची या शेतकऱ्यांची योजना आहे. मात्र, या दोन्ही सीमांवर पोलिसांनी या शेतकरी आंदोलकांना रोखून धरले आहे. यातच शेतकऱ्यांनी आपले आंदोलन पुन्हा एकदा हिंसक केले आहे. या आंदोलक शेतकऱ्यांनी खनौरी सीमेवर जबरदस्तीने बॅरिकेडिंग हटविण्याचा प्रयत्न केला, याच वेळी त्यांची पोलिसांसोबत झटापट उडाली. यानंतर पोलिसांनी आंदोलक शेतकऱ्यांना पांगवण्यासाटी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. एवढेच नाही, तर पोलिसांनी रबरी गोळ्यांचा वापरही केला. या घटनेत २० वर्षीय आंदोलकाचा मृत्यू झाला आहे. तर २५ जण जखमी झाले आहेत. यांपैकी दोन जणांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमी शेतकरी आंदोलकांपैकी दहा जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर इतरांवर शंभू येथील तात्पुरत्या स्वरुपाच्या वैद्यकीय शिबिरात प्राथमिक उपचार करण्यात आले. जखमींपैकी तीन शेतक ऱ्यांना पटियाळा येथील राजिंद्र रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स गरूरचे सिव्हिल सर्जन डॉ कृपाल सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, एका २६ वर्षीय व्यक्तीच्या डोक्याला दुखापत झाली असून त्याला राजींद्र रुग्णालयात ाखल करण्यात आले आहे. आंदोलक शेतकऱ्याच्या मृत्यूची बातमी समजताच पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडणे बंद केले आहे.





TRiLOGiC
COMPUTERS & SERVICES
Cell no. : 08928399966, 09764399966


गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक – बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती–६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com., Website : www.gauravprakashan.com (HARD COPY-B/W, PDF- COLOUR)